संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

## संपादकीय

# नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# अवकाळीच्या धुळवडीने पिकांची धुळधाण

राज्यभरात होळीच्या सणाची धुमधाम सुरू असतानाच जवळपास सत्तर पंच्याहत्तर वर्षांनंतर होळीच्या दिवशी अवकाळी पाऊस पडण्याचा प्रकार घडला आहे. एवढेच नव्हे तर दुसऱ्या धुळवडीच्या दिवशीदेखील राज्याच्या अनेक भागांत गारपीट, वादळी वारे, विजांचा कडकडाट यासह दोन दोन तास सलग पाऊस पडल्याने गहू, हरभरा, मका, कापूस, द्राक्ष, कांदा, अशा कितीतरी पिकांची नासाडी झालेली आहे. अवकाळी पाऊस हा काही नवीन प्रकार राहिलेला नाही. परंतु चैत्र पाडव्याला थोडीफार वृष्टी करून हा अवकाळी पाऊस हजेरी लावत आल्याचे अनेक ठिकाणी सांगितले जाते. महाराष्ट्रात साडेतीन पीठापैकी एक असलेल्या सप्तशृंगी गडावर चैत्राच्या सुरुवातीला हमखासपणे पाऊस पडतो आणि हा पाऊस गड धुवायला येतो अशी पारंपारिक समजूतही आहे. परंतु यावर्षी बऱ्याच ठिकाणी एकाच वेळेला अनपेक्षितपणे वादळ आणि गारांसह झालेल्या या पावसाने धुळवडीच्या दिवशीच उभ्या पिकांची धुळधाण केलेली पाहायला मिळते. यापूर्वी अगदी गणेशोत्सवाच्या काळात नेमक्या विसर्जनाच्या दिवशी पाऊस येणे, दिवाळीतल्या पाच दिवसांपैकी एखाद्या दिवशी तरी पावसाने हजेरी लावणे अशा गोष्टी घडत आलेल्या आहेत. मात्र आता जो होळीचा सण केवळ जागोजागी लाकडं, गोवऱ्या किंवा कचरा पेटवूनच साजरा केला जातो, त्याच दिवशी पावसाने काही ठिकाणी हजेरी लावून ही पेटलेली होळी विझवण्याचेच काम केले. किंबहुना त्या उत्साहावर पाणी फिरवले. विदर्भ, मराठवाडा, खांदेशात धुळे, नंदुरबार, कोकणात काही ठिकाणी तर पश्चिम महाराष्ट्रातल्या पुण्यासह दोन तीन जिल्ह्यांमध्ये पावसाने अचानक हजेरी लावली. विशेष म्हणजे या अवकाळी पावसात वादळी वाऱ्याचे आणि विजेच्या कडकडाटांचे प्रमाण सर्वाधिक होते. अनेक जिल्ह्यांत बकऱ्या, मेंढ्या, कोंबड्या यांचेदेखील या गारपीटीने बळी घेतले आहेत. शेतकऱ्यासाठी पूरक ठरणारे हे पशूधनही या अवकाळीच्या तडाख्यात सापडले. होळीच्या उत्साहावर अवकाळी पावसाची अवकळा आल्याने लोकांचा हिरमोड झालाच. परंतु नुकसानही मोठ्या प्रमाणावर झालेले आहे.

### पंधरा वर्षांत बदललेले वातावरण

गेल्या दहा-पंधरा वर्षांचा जर आढावा घेतला तर या अवकाळी पावसाचे प्रमाण दरवर्षी वाढत गेल्याचे लक्षात येते. म्हणजे अगदी चुकूनमाकून वर्षातून एखाद दुसरा अवकाळी पाऊस, चक्रीवादळ अशा प्रकारच्या घटना घडत असत. परंतु अलिकडे मात्र त्याचे प्रमाण आश्चर्यकारकरित्या वाढले आहे. आणि आता तर वर्षातून जवळपास प्रत्येक महिन्यात सरासरी कुठे ना कुठे हा अवकाळी पाऊस पडल्याचे पाहायला मिळते. म्हणूनच गंमतीने त्याला अवकाळी न म्हणता बारमाही पाऊस म्हणण्याची पाळी येते. यातला गांभीर्याचा भाग असा आहे की, भारत हा कृषीप्रधान देश आहे. त्या त्या राज्यामध्ये भौगोलिक परिस्थितीनुसार शेतीची वेगवेगळी पिके होतात. पावसाळ्यानंतरचे तीन चार महिने हे रब्बी पिकांचे असतात. ज्यामध्ये जमिनीत मुरलेल्या पाण्यावर काही पिके येतात. काही प्रमाणात गहू, हरभरा, ही पिके महाराष्ट्रात अनेक भागांत घेतली जातात. ज्या शेतकऱ्यांकडे पाण्याची उपलब्धता आहे, त्यांच्यासाठी तर आताचा हा सगळा कालावधी गहू, ऊस, हरभरा, कांदा यासारख्या पिकांसाठी उपयुक्त असतो. पश्चिम महाराष्ट्र, नाशिक, जळगाव, या भागात केळी, ऊस आणि द्राक्ष, विदर्भामध्ये संत्र, सोयाबिन, यासारखी पिके घेतली जातात. तर कोकणात या कालावधीत आंब्याचा मोहर आलेला असतो. परंतु अशा अचानक कोसळणाऱ्या आणि वादळवाऱ्यासह येणाऱ्या अवकाळी पावसामुळे हातातोंडाशी आलेले पीक नाहीसे होते. वेधशाळांनी जरी अंदाज व्यक्त केलेला असला तरी ही पिके वाचवण्यासाठी कोणतीही उपाययोजना करता येत नाही हे त्यातले वास्तव आहे. महाराष्ट्रात तर दरवर्षी किंबहुना दर महिन्याला आता या अवकाळी पावसाचे थैमान पाहायला मिळते आणि ठिकठिकाणी शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीला तोंड द्यावे लागते. अगदी पीकविम्यासारखी सोय असूनदेखील त्याचा उपयोग होत नाही. एकीकडे या अशा प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती आणि दुसरीकडे कांदा, टोमॅटो, भाजीपाल्याचे अचानक कोसळणारे भाव शेतकऱ्याची कसोटी पाहतात. विशेषतः जे सामान्य शेतकरी आहेत, त्यांच्याकडे फार मोठी शेती नसते किंवा त्यांची आर्थिक क्षमताही साधारण स्वरूपाची असते. त्यांना मोठ्या नुकसानीला तोंड द्यावे लागते.

### शेती हा कष्टसाध्य उद्योग

अनेकांच्या म्हणण्याप्रमाणे यंदा प्रथमच होळीच्या काळात आलेला हा अवकाळी पाऊस गांभीर्याने लक्षात घेतला पाहिजे. हवामानात बदल होतो आहे. तापमानात वाढ होते आहे. समुद्राची पातळीदेखील वाढू लागली आहे. अशी एक ना अनेक हवामान किंवा पर्यावरणासंबंधी कारणे सांगितली जातात. या सगळ्या प्रकारांना नैसर्गिक आपत्ती असे संबोधून सरकारी यंत्रणा जबाबदारी झटकत राहतात. परंतु व्यापक अर्थाने विचार केला तर भारतासारख्या कृषीप्रधान देशात ज्याच्यावर साठ टक्के लोक उपजिवीका करतात, त्यांचा विचार करताना या अवकाळी पावसापासून शेतीला कसे वाचवता येईल, असा विचार झाला पाहिजे. विकसित होणारे तंत्रज्ञान त्यासाठी उपयोगात आणले पाहिजे. वेधशाळांकडून उपलब्ध होणारी माहिती ही जरी सहाय्यभूत ठरत असली तरी ती शंभर टक्के खात्रीची आहे असे म्हणता येत नाही. म्हणूनच पावसाळ्यानंतरच्या काळात बदलत्या पर्यावरणाचा विचार करून शेती करण्याचे तंत्र विकसित करावे लागेल. शेतकऱ्यांची हजारो रुपयांची गुंतवणूक असते. सलग काही महिन्यांचे परिश्रम, कष्ट त्यामागे असतात. पिकाची पेरणी, त्याच्यासाठी खतांची तजवीज, जंतुनाशकांची फवारणी एकूणच पिकांचे संवर्धन करण्याकरिता बऱ्याच प्रक्रियांमधून शेतकऱ्याला जावे लागते. थोडक्यात सांगायचे तर शेती हा एकूणच कष्टसाध्य उद्योग आहे आणि ते कष्ट केवळ अवकाळी पावसाच्या लहरीपणामुळे मातीमोल होता कामा नये. शेतकऱ्याला या अवकाळी पावसापासून संरक्षण मिळण्याची आवश्यकता आहे.



# मुंबई इंडियन्सने आरसीबीचा ९ गडी राखून केला पराभव

मुंबई

WPL

स्मृती मंधाना हिच्या आरसीबी संघाचा मुंबई इंडियन्सने अक्षरश धुव्वा उडवला. मॅथ्यूस आणि ब्रन्ट या जोडीने आरसीबीच्या गोलंदाजांची येथेच्छ धुलाई करीत ११४ धावांची मोठी भागीदारी केली त्यामुळे आरसीबीला मानहानीकारक पराभवाला सामोरे जावे लागले. नाणेफेक जिंकून सर्वात आधी फलंदाजीसाठी मैदानात उतरलेला आरसीबीचा संपूर्ण संघ१८ . ४ षटकांत १५५ धावांवर गारद झाला. आरसीबीच्या सलामीच्या फलंदाजांनी पहिल्या विकेटसाठी ३९ धावा केल्या. मात्र यानंतर आरसीबीचा वेग कमी झाला व त्यानंतर त्यांनी सलग विकेट्स गमावल्या. विकेटकीपर रिचा घोषनं सर्वाधिक २८ धावांची खेळी केली. तर स्मृती मंधाना आणि श्रेयंका पाटील यांनी २३-२३ धावा केल्या. मुंबई इंडियन्सकडून हेली मॅथ्यूजनं सर्वाधिक तीन बळी घेतले, तर एमिलिया केर आणि सायका इशाकनं प्रत्येकी दोन बळी घेतले. बंगळुरूनं दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सची सुरुवात चांगली झाली. यास्तिका भाटियासह हेली मॅथ्यूजनं पहिल्या विकेटसाठी ५षटकांत ४५ धावांची भागीदारी केली. यास्तिका भाटियानं प्रिती बोसच्या चेंडूवर एलबीडब्ल्यू होण्यापूर्वी चार चौकारांच्या मदतीनं २३ धावा केल्या. एक विकेट पडल्यानंतर, आरसीबीच्या चाहत्यांना आशा होती की, त्यांचा संघ पुनरागमन करू शकेल. हेली मॅथ्यूज आणि नॅट सायव्हर-ब्रंट ही जोडी आरसीबीच्या गोलंदाजांवर तुटून पडल्यानं तसं झालं नाही. दोन्ही खेळाडूंनी चौकार आणि षटकारांचा पाऊस पाडत सामना एकतर्फी केला. याचा परिणाम म्हणून मुंबई इंडियन्सने ८६ चेंडूत १५९ धावा करून सामना जिंकला.


## मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ

म्हाडा MHADA

**ई-निविदा सुचना क्र.: का. अ. (पूर्व)/ मुं.झो.सु. मंडळ/ई-निविदा/८०/२०२२-२३ (दुसरी बोली)**

कार्यकारी अभियंता (पूर्व) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३६, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१ (दुरध्वनी क्र. ०२२-६६४०५२५१) यांनी योग्य वर्गवारी तथा शासकीय किंवा निमशासकीय नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकूण **०५** कामाकरीता बी-१ (टक्केवारी) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. विस्तृत ई निविदा सुचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळ **http://mahatenders.gov.in** वर उपलब्ध असतील. निविदा विक्री **दिनांक ०८.०३.२०२३ सकाळी १०.०५ पासून दिनांक १५.०३.२०२३ सायंकाळी ६.१५** पर्यंत राहील. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त **http://mahatenders.gov.in** संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (पूर्व), मुं. झो. सु. मंडळ यांनी राखुन ठेवला आहे.

CPRO/A/140

सही/-
कार्यकारी अभियंता (पूर्व),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था



## 'नवाकाळ'ला १०१ व्या वर्षात पदार्पणानिमित्त हार्दिक शुभेच्छा



श्री. शंकरशेठ लक्ष्मण पिंगळे
संचालक - मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती, मुंबई
अध्यक्ष- श्री.कुलस्वामी को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
प्रमुख सल्लागार - घाऊक भाजीपाला व्यापारी महासंघ



### मार्केटचा इतिहास

जुन्या मुंबईतून सर्व घाऊक भाजी मार्केट १९ फेब्रुवारी १९९६ रोजी नव्या मुंबईत स्थलांतरीत झाली. एकाच छताखाली सर्व घाऊक मार्केट असावीत व शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव मिळावा म्हणून युती सरकारच्या काळात मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना भाजी मार्केट नव्या मुंबईत स्थलांतरित झाले. वाशी मार्केटमध्ये प्रत्येक व्यापाऱ्याला स्वत:चा गाळा मिळाला. शेतमाल ठेवण्यासाठी मुबलक जागा मिळाली.

### घाऊक भाजीपाला व्यापारी महासंघाचे नेत्रदीपक काम

स्वत:चा गाळा व स्वतंत्र स्वत:चे ऑफीस मिळाल्यानंतर व्यापाऱ्यांच्या व्यापारामध्ये वाढ झाली. फक्त महाराष्ट्रातून नव्हे तर भारताच्या कानाकोपऱ्यातून भाजीपाला मार्केटमध्ये येऊ लागला. मालाची वाढ व्यापार वाढला. त्याचबरोबर व्यापाऱ्यांची समस्यादेखील वाढली. वाहतूक कोंडी, पिण्याचे पाणी, शौचालय, बँका, पोस्ट ऑफिस इ. गरज व्यापाऱ्यांना भासवू लागली. त्यामुळे व्यापाऱ्यांच्या न्याय हक्कासाठी लढण्यासाठी व्यापाऱ्यांची संघटना असावी म्हणून दि. १२/२/२००४ रोजी घाऊक भाजीपाला व्यापारी महासंघाची स्थापना झाली. प्रथम अध्यक्ष चंद्रकांत जगताप व सचिव म्हणून उस्मानभाई सय्यद यांनी नेटाने महासंघाचे काम पाहिले. त्यानंतर व्यापाऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीवर प्रथम अशोक गावडे म्हणून संचालक निवडून गेले. त्यानंतर सतत दोनदा शंकरशेठ पिंगळे संचालक म्हणून बाजारसमितीवर निवडून गेले. त्यांनी भाजीमार्केटमध्ये बऱ्याच सुधारणा केल्या. व्यापाऱ्यांसाठी पाणीपोई, नवीन, आवक गेट, सार्वजनिक स्वच्छता, महासंघाचे नवीन कार्यालय विठोबा रखुमाई मंदिराचा जिर्णोद्धार इ. व्यापाऱ्यांची कामे केली. दरवर्षी व्यापारी महासंघातर्फे १९ फेब्रुवारी दिवशी सत्यनारायण महापूजा व शिवजयंती उत्सव साजरा केला जातो.

महासंघातर्फे आयोजित कोविड लसीकरण ■ केंद्रातून १६ हजार नागरिकांचे लसीकरण



श्री. कैलास धों. ताजणे
अध्यक्ष



श्री. सुनिल ना. मांढरे
कार्याध्यक्ष



श्री. चंद्रकांत ल. जाधव
सचिव



श्री. भाऊसाहेब (दाजी) पां. भोर
खजिनदार

शुभेच्छुक - घाऊक भाजीपाला व्यापारी महासंघ व सर्व पदाधिकारी



## जाहीर सूचना

सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की, **बँक ऑफ बडोदा, कफ परेड शाखा श्री. बेहारी एल. डाब्राई** यांच्या नावे असलेली निम्न उल्लेखित मालमत्ता तारण म्हणून स्वीकारण्यास इच्छुक आहे. ज्यामध्ये पक्षकारांनी असे सूचित केले आहे की, मूळ कागदपत्र म्हणजेच; मे. बी जी कन्स्ट्रक्शन्स (बिल्डर) आणि श्रीमती कमला सोभराज यांच्या दरम्यान बनलेले करारपत्र आणि श्रीमती कमला सोभराज (विक्रेता) आणि सौ. फरझना खान (खरेदीदार) यांच्या दरम्यान बनलेले सदर सदनिकेच्या संदर्भातील करारपत्र हरवले आणि गहाळ झाले आहे.

कोणा व्यक्ती किंवा व्यक्तींचा सदर युनिटवर विक्री, गहाणवट, प्रभार, धारणाधिकार, भेट, न्यास, किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणत्याही स्वरुपाचा कोणताही हक्क असल्याचा दावा करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती किंवा व्यक्तींनी त्याबाबत त्याच्या समर्थनार्थ मूळ कागदोपत्री पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर सदर सूचना प्रसिद्धीपासून १० दिवसांच्या आत लेखी स्वरुपात सूचित करावे अन्यथा दावा, जर असल्यास, सोडून दिला असे समजण्यात येईल, आणि असे मानण्यात येईल की, मालमत्ता कोणत्याही प्रभार/दावा/बोज्यापासून मुक्त आहे.

**अनुसूची**

गाव-कुलाबा विभाग, जिल्हा - मुंबई शहरच्या सर्व्हे क्र. ३५६ धारण केलेल्या जमिनीवरील २ री पास्ट लेन, कुलाबा, मुंबई - ४००००५ येथे स्थित "कुलाबा कल्पना सीएचएसएल" या इमारतीमधील ५ व्या मजल्यावरील सदनिका क्र. ३८-ए, मोजमाप अदमासे २६५ चौ.फू. (म्हणजेच समतूल्य २४.६२ चौ. मी.) बिल्ट-अप क्षेत्रफळ.

**शाखा तपशील / संपर्क क्र.:**
बँक ऑफ बडोदा,
कफ परेड शाखा, एमटीएनएल इमारत,
जी डी सोमाणी मार्ग, कफ परेड,
मुंबई ४००००५ +९१-२२-२२१८३७५४.

**वकील रेणुका एम. नायर**
दुकान क्र. ०५, इमारत क्र. १६,
सोनम क्लासिक, फेज XI,
न्यू गोल्डन नेस्ट,
भाईंदर (पू), ठाणे.



## जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, **सीटीएस क्र. ३४७ - ब्लॉक क्र. १, २ रा मजला, पोद्दार रोड, विणा नर्सिंग ॲण्ड चिल्ड्रन होमच्या वर, वल्लभ दर्शन इमारतीजवळ, मालाड पूर्व, मुंबई - ४०००९७** आणि **११२, ३ रा मजला, स्वप्न सिद्धी सी.एच.एस. लि., इमारत क्र. ३, टाटा पॉवर हाऊस, बोरीवली पूर्व, मुंबई - ४०००६६** येथे स्थित मालमत्तांचे मालक **दिवंगत श्री. रमणिकलाल केशानी यांचे पुत्र दिवंगत श्री. सुभाषचंद्र रमणिकलाल केशानी उर्फ शुभाषभाई** यांचे दि. ०५.०२.२०२३ रोजी मालाड, मुंबई येथे निधन झाले. त्यांनी त्यांच्या सर्व जंगम आणि स्थावर मालमत्तांच्या संदर्भात त्यांच्या हयातीत त्यांचे अंतिम इच्छापत्र आणि मृत्युपत्र बनविले होते.

सदर मालमत्ता किंवा त्यांच्या कोणत्याही भागामध्ये कोणा व्यक्ती/क्तींचा विक्री, भेट, भाडेपट्टी, वारसा, अदलाबदल, गहाणवट, प्रभार, धारणाधिकार, न्यास, ताबा, मूल्यांकन, जप्ती किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही हितसंबंध असल्याचा दावा असल्यास, त्यांनी त्याबाबत निम्नस्वाक्षरीकार यांना लेखी स्वरुपात **ए/१, आशिष अपार्टमेन्ट, कुरार पोलीस स्टेशनच्या मागे, पश्चिम द्रुतगती महामार्गाजवळ, मालाड (पूर्व), मुंबई - ४०० ०९७** येथे स्थित कार्यालयात आजच्या दिनांकापासून **१५ दिवसांच्या** आत सूचित करणे आवश्यक आहे. असे न केल्यास सदर मालमत्तेवर कोणताही दावा नाही असे मानण्यात येईल आणि सदर मालमत्ता **श्री. आशुतोष अरविंद पाठक** यांच्या नावे हस्तांतरित करण्यात येईल आणि तो दावा सोडून दिला आणि गुंडाळून ठेवला असे समजण्यात येईल.

ठिकाणः मुंबई
दिनांकः ०८ मार्च, २०२३

सही/-
**कु. रंजिता एस. जैन**
**वकील - उच्च न्यायालय**



## महानिर्मिती

## ई - निविदा सूचना

चंद्रपूर महा औष्णिक विद्युत केंद्र महानिर्मिती, खालील निविदांसाठी स्पर्धात्मक बोली प्रक्रियेमध्ये भाग घेण्याकरिता प्रतिष्ठित आणि अनुभवी कंपन्याकडून प्रस्ताव मागवीत आहेत.

| अनु. क्र. | निविदा क्र. (आरएफएक्स क्र.)/वर्णन/अंदाजित मूल्य रूपये |
|---|---|
| १ | ३०००036१४९/जसे आणि जेव्हा आवश्यकता आधारावर युनिट - ३ आणि ४ कुलींग टॉवरचे कुलींग टॉवर नोझल्स पुरविणे आणि बदलणे आणि बेसीन्सची सफाई आणि संबंधीत कार्य. / रू.१९६१२२६.९६ |
| २ | ३०००३६३९०/डब्ल्यूटीपी-II सीएसटीपीएस येथील युनिट क्र. ३ ते ९ च्या रॉ वॉटर, पेय जल आणि कुलींग वॉटच्या नमून्यांचे संकलन आणि पृथ्थकरण कार्य./ रू.१३३५८५२/- |
| ३ | ३०००३६३८६/सीएसटीपीएस, चंद्रपूर येथील ९०/४५/४५/ एमव्हीए, ४००/११.५ के. व्ही स्टेशन ट्रान्सफॉर्मर क्र. ३ च्या अंतर्गत निरीक्षणाचे कार्य. / रू.२००१८१७.८१ |
| ४ | ३०००३६४४६/सीएचपीडी, सीएसटीपीएस येथे स्थापित अॅप्रॉन फिडर आणि स्टॅकर रेक्लेमरसाठी व्हेरीएबल डिस्प्लेसमेंट पंपांचे प्रापण कार्य./ रू.१३८६५०२.७० |
| ५ | ३०००३६४४३सीएसटीपीएस कॉलनी आणि पॉवर हाऊस परिसर चंद्रपूरमध्ये गाय, बैल, गाडीचे बैल, म्हैस, श्वान, डुक्कर, माकड यासारख्या मृत जनावरांची विल्हेवाट लावण्यासाठी वार्षिक कंत्राट. / रू.३७३९६७.८८ |
| ६ | ३०००३६४४२/सीएसटीपीएस, चंद्रपूर येथील कॉलनीमधील विविध प्रकारच्या इमारतींना वाळविरोधक प्रक्रिया पुरविण्याचे वार्षिक कंत्राट./ रू.२५५८२५०.१० |
| ७ | ३०००३६४७०/दोन वर्षांच्या कालावधीसाठी सीएसटीपीएस, चंद्रपूर येथील प्रशासकीय इमारत, ओआरसी, डब्ल्यूआरसी, दवाखाना, सुरक्षा कार्यालय (सुरक्षा चौकी समाविष्ट) च्या सफाईचे कार्य./रू.१३८०४५०२.१३ |
| ८ | ३०००३६४७१/सीएसटीपीएस येथे २ वर्षांच्या कालावधीसाठी युनिट - ३ आणि ४ च्या ॲश हँडलींग प्लांटमधील ॲश डिस्पोजल पंपांच्या ओव्हरहाऊलींगसाठी वार्षिक परिरक्षण कार्य. / रू.३१५७७१४.२ |
| ९ | ३०००३६४६६/सीएसटीपीएससाठी गम बुटाचे प्रापण कार्य./ रू.१३११३००/- |

उपरोक्त नमुद निविदा महानिर्मितीच्या ऑनलाईन पोर्टलमध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे. सविस्तर निविदा दस्तावेजासाठी, इच्छुक बोलीदारांनी एसआरएम संकेतस्थळ **https://eprocurement.mahagenco.in** वर (अनु. क्र. ०१ ते ०९) साठी भेट द्यावी. कोणत्याही प्रश्नांकरिता संपर्क क्र. ८५५४९९१८१८ वर संपर्क साधावा.

हस्ता/-
मुख्य अभियंता (ओ ॲण्ड एम)
सीएसटीपीएस, चंद्रपूर



## फॉर्म ए

### जाहीर उद्घोषणा

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

**फ्यूचर एन्टरप्राईजेस लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

**संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | फ्यूचर एन्टरप्राईजेस लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थापनेचा दिनांक | १२ ऑक्टोबर, १९८७ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले | कंपनी निबंधक, महाराष्ट्र, मुंबई नोंदणीकरण क्र. ०४४९५४ |
| ४. | कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट ओळख क्र./मर्यादित दायित्व ओळख क्र. | L52399MH1987PLC044954 |
| ५. | कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | नॉलेज हाऊस, श्याम नगर, जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई - ४०००६० महाराष्ट्र |
| ६. | कॉर्पोरेट ऋणकोच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याचा दिनांक | आदेशाचा दिनांक: २७ फेब्रुवारी, २०२३ आदेश प्राप्त झाल्याचा दिनांक: ७ मार्च, २०२३ |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक | २६ ऑगस्ट, २०२३ (म्हणजेच, २७ फेब्रुवारी, २०२३ पासून १८० दिवस) |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | श्री. जितेंदर कोठारी आयपी नोंदणीकरण क्र.: IBBI/IPA-001/IP-P00540/2017-18/10965 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | ७०२, ऑर्चिड ए विंग, एव्हरशाईन पार्क सीएचएस, ऑफ वीरा देसाई मार्ग, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५३. ईमेल : jitenderkothari@rediffmail.com |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | ७०२, ऑर्चिड ए विंग, एव्हरशाईन पार्क सीएचएस, ऑफ वीरा देसाई मार्ग, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५३. ईमेल आयडी: irp.future@gmail.com |
| ११. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | २१ मार्च, २०२३ (आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांक ७ मार्च, २०२३ पासून १४ दिवस) |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये धनकोचे वर्ग, जर असल्यास. | आयआरपीकडे उपलब्ध माहितीनुसार उपलब्ध नाही. |
| १३. | वर्गामध्ये धनकोचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गामध्ये तीन नावे) | आयआरपीकडे उपलब्ध माहितीनुसार उपलब्ध नाही. |
| १४. | (अ) संबंधित अर्ज आणि (ब) प्राधिकृत प्रतिनिधींच्या तपशीलाची उपलब्धता | वेबलिंक: http://www.ibbi.gov.in/downloadform.html लागू नाही. |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ, न्यायालय III यांनी त्यांच्या आदेश सी.पी. क्र. ५१३/आयबीसी/एमबी/२०२२ दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी नुसार फ्यूचर एन्टरप्राईजेस लिमिटेडची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश दिले आहेत. आदेश दि. ७ मार्च, २०२३ रोजी प्राप्त.

फ्यूचर एन्टरप्राईजेस लिमिटेडच्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. २१ मार्च, २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.

आर्थिक धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.

नोंद क्र. १२ समोर नमूद केल्यानुसार वर्गाशी संबंधित वित्तीय कर्जदाराने, फॉर्म सीएमधील वर्गाचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम पाहण्याकरिता नोंद क्र. १३ समोर नमूद तीन दिवाळखोरी व्यावसायिकांमधून अधिकृत प्रतिनिधी (लागू नाही) म्हणून त्यांची पसंती नमूद करावी. दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

सही/-
जितेंदर कोठारी
अंतरिम ठराव व्यावसायिक
अंतरिम ठराव व्यावसायिक
IBBI/IPA-001/IP-P00540/2017-18/10965

ठिकाण: मुंबई
दिनांक: ८ मार्च, २०२३

एएफए क्र. AA1/10965/02/210923/104532 वैधता २१.०९.२०२३ पर्यंत


## सुविचार


विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी.
मोबा.९४२२४२०६११

माणूस दोन पद्धतीने जिंकतो एकतर स्वतःच्या हिंमतीने किंवा इतरांच्या पुढं पुढं करून, मागं मागं करून. पण असं कुणाच्या मागं पुढं करून माणूस जेव्हा जिंकतो तेव्हा त्यात स्वाभिमान नसतो आणि स्वाभिमानाशिवाय जिंकणं ही त्या माणसाची सर्वात मोठी हार असते.

## पंचांग

बुधवार, ८ मार्च २०२३
शक १९४४ शुभकृतनामसंवत्सर

फाल्गुन कृष्ण प्रतिपदा * नक्षत्र : उत्तरा फाल्गुनी



-: जन्मराशी :-
००-०१ ते ८-५२ सिंह
०८-५३ ते २४-०० कन्या

रवी उदय- ०६-५४
रवी अस्त- १८-४५

वसंतोत्सवारंभ, अभ्यंगस्नान, जागतिक महिला दिन


## बृहन्मुंबई महानगरपालिका

### ई-निविदा सूचना

| | |
|---|---|
| निविदा प्रपत्र क्र. | **ई-निविदा क्र. ७२०००४९८६६** |
| संस्थेचे नाव | **बृहन्मुंबई महानगरपालिका** |
| विषय | ई-निविदा क्र. खेरवाडी जंक्शन एच/पूर्व प्रभाग येथील पुलाखालील क्षेत्राचे सुशोभिकरण आणि सर्वोत्तम वापर. |
| निविदेची किंमत | रु. १०,४०० + लागू जीएसटी) |
| ई-निविदेची किंमत (अंदाजित किंमत) | रु. २,३३,२२,९२७.६५/- |
| बोली सुरक्षा अनामत / इरअ | रु. २,३३,२३०.००/- |
| निविदा पारित करण्याचा आणि विक्रीचा दिनांक | दि. ०८.०३.२०२३ रोजी दु. ११.०० पासून |
| बोली पूर्व सभा | लागू नाही |
| निविदा विक्रीचा अंतिम दिनांक व वेळ | दि. १५.०३.२०२३ रोजी दु. १२.०० वाजेपर्यंत |
| पाकीट अ, ब आणि पाकीट क आणि ईएमडीचे सादरीकरण | दि. १५.०३.२०२३ रोजी दु. १६.०० वाजेपर्यंत |
| ई-पाकिट अ उघडणे | दि. १५.०३.२०२३ रोजी दु. १६.०१ वाजेपर्यंत |
| ई-पाकिट ब उघडणे | दि. १५.०३.२०२३ रोजी दु. १६.१५ वाजेपर्यंत |
| एएसडीच्या नावे भौतिक डीडीचे सादरीकरण | दि. २१.०३.२०२३ रोजी सायं. १६.०० पूर्वी सहा. आयुक्त (एच/पूर्व) यांच्या कार्यालयात. |
| पाकिट क उघडणे | दि. २३.०३.२०२३ रोजी दु. १६.०० वाजेपर्यंत |
| संपर्काचा पत्ता | **सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय, एच/पूर्व प्रभाग कार्यालय,** १३७ टीपीएस-५, २रा रस्ता, प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पू), मुंबई - ४०००५५. |
| बोली उघडण्याचे ठिकाण | सहाय्यक आयुक्त (एच/पूर्व) यांचे कार्यालय, |

पीआरओ/३०३०/जाही/२०२२-२३

सही/-
सहाय्यक आयुक्त (एच/पूर्व)

कोणताही ताप असू शकतो हिवताप



मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे**

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande**